अहवाल क्रमांक :१२९

# पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## चंद्रपूर, वर्धा व सोलापूर जिल्हा परिषदांच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

## चौथा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०११

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\COMMITTEES\D-6 PRC\12 report\4 th report admmine.doc

# पंचायती राज समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

चंद्रपूर, वर्धा  व सोलापूर जिल्हा परिषदांच्या
सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

# चौथा अहवाल

# पंचायती राज समिती
# (२०१०-२०११)

**समिती प्रमुख :**

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिती सदस्य :**

२. ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३. श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४. श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७. श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८. श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९. श्री. उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११. श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३. श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४. श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८. श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२०. श्री. नितीन भोसले, वि.स.स.

२१. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२. श्री. विक्रम काळे, वि.प.स

२३. ॲड उषा दराडे, वि.प.स.

२४. श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव.

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव.

श्री.प्र.दि.मयेकर, कक्ष अधिकारी.

श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

# पंचायती राज समिती
# (२००८-२००९)

**समिती प्रमुख :**

१. श्री. सुभाष ठाकरे, वि.स.स.

**समिती सदस्य :**

*२. श्री. राजन पाटील, वि.स.स.

३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.

४. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

५. श्री. संपतराव अवघडे, वि.स.स.

६. श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

**७. रिक्त

८. श्री. पी.एन.पाटील, वि.स.स.

९. श्री. सुभाष बने, वि.स.स.

१०. श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११. श्री. पद्माकर वळवी, वि.स.स.

१२. श्री. डी.एस.अहिरे, वि.स.स.

१३. श्री. आशिष जयस्वाल, वि.स.स.

१४. श्री. तुकाराम सुर्वे, वि.स.स

१५. श्री. अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

१६. श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

१७. श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

१९. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

२०. श्री. हेमंत पटले, वि.स.स.

२१. श्री. राजन तेली, वि.प.स.

२२.  श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

२३.  श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४.  श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५.  श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव.

श्री. ता.नि.मिसाळ, अवर सचिव.

---

* सन्माननीय सदस्य श्री.नानाभाऊ पंचबुद्धे यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समोवश झालेला असल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर सन्मानलीय सदस्य श्री.राजन पाटील, वि.स.स. यांची दिनांक २९ जानेवारी, २००९ रोजी नामनियुक्ती करण्यात आली.

** सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांचा मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून समावेश झालेला असल्यामुळे पद रिक्त.

# पंचायती राज समिती
## (२००७-२००८)

**समिती प्रमुख**

१. श्री.राजन पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

२. श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री.दिलीप बनसोड, वि.स.स.

४ श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५ श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

६ श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

*७ श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

८ ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

९ श्री.सुभाष बने, वि.स.स.

१० श्री.राजेंद्र मुळक,वि.स.स.

११ श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

१२ श्री.सुनिल केदार, वि.स.स.

१३ श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१४ श्री.कैलास पाटील, वि.स.स.

१५ श्री.विश्वास नांदेकर, वि.स.स.

१६ श्री.संजय राठोड, वि.स.स.

१७ श्री.अतुल देशकर, वि.स.स.

१८ श्री.उत्तम इंगळे, वि.स.स.

१९ श्री.साहेबराव घोडे, वि.स.स.

२० श्री.सदाशिव लोखंडे, वि.स.स.

**२१ रिक्त

२२ श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२३ श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

२५ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव.

श्री. भा.ना.कांबळे, सह सचिव.

श्री. वि.वा.देशमुख, कक्ष अधिकारी.

---------------------------------------------------------------------------------------------------------------------
----------------

* सन्माननीय सदस्य श्री. दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायती राज समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर दिनांक २४ जुलै, २००७ रोजी श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.

** श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक २४ फेब्रुवारी, २००८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

**(नऊ)**

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चौथा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१०-२०११ करिता समिती दिनांक ४ मार्च, २०१० रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ च्या वाषिर्क प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने चंद्रपूर, वर्धा व सोलापूर या जिल्हा परिषदांची सखोल तपासणी केली.

समितीने चंद्रपूर जिल्हा परिषदेस दिनांक २७, २८ व २९ डिसेंबर, २००७ रोजी भेट देऊन श्री.व्ही.एस.बरडे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.डी.चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने वर्धा जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ फेब्रुवारी, २००८ रोजी भेट देऊन श्रीमती गं ुजन किन्नु, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्रीमती शं.अ.डोंगरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वर्धा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने सोलापूर जिल्हा परिषदेस दिनांक २८, २९ व ३० मे, २००८ रोजी भेट देऊन श्री.सु.म.केंद्रेकर., मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.एस.आर.भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सोलापूर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१०-२०११ करिता गठीत झालेल्या समितीने चंद्रपूर, वर्धा व सोलापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झ ाालेल्या लेखी माहितीच्या, तसेच साक्षीचे वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनुक्रमे दिनांक १२ मे २०१० व ९ जून, २०१० रोजी जिल्हा परिषद चंद्रपूर संदर्भात, दिनांक ६ जूलै, २०१० रोजी जिल्हा परिषद वर्धा संदर्भात व दिनांक ८जून, २०१० रोजी जिल्हा परिषद सोलापूर संदर्भात मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

**(दहा)**

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. ठाकरे, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, श्रीमती शर्वरी गोखले, अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

तसेच जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकरी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत अहवालाच्या शेवटी "परिशिष्ट" म्हणून जोडण्यात आला आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या चंद्रपूर, वर्धा व सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केल्या आहेत..

सन २०१०-२०११ साठी गठित झालेल्या समितीने दिनांक      एप्रिल, २०११ रोजीच्या बैठकीत अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १८ एप्रिल, २०११.

**बबनराव शिंदे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**(अकरा)**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक**<br>**चंद्रपूर ज्रिल्हा परिषद** | |
| १ | १.१ | प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम व दुरुस्ती<br>(कोसरसार, ता. वरोरा, सावरी, ता.चिमुर) | |
| | १.२ | भद्रावती पंचायत समिती - विभाग प्रमुखांनी भेटी न दिल्याबाबत. | |
| | | **प्रकरण दोन**<br>**वर्धा जिल्हा परिषद** | |
| २ | २.१ | जिल्हा परिषदेतील अफरातफर व गैरव्यवहाराची प्रकरणे | |
| | | **प्रकरण तीन**<br>**सोलापूर जिल्हा परिषद** | |
| ३ | ३.१ | जवाहर विहिर योजना कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांच्या विहिरींना विद्युत जोडणी देणे. | |
| | | **परिशिष्ट** | |
| ४ | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त. | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद - चंद्रपूर

### १.१ प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम व दुरुस्ती (कोसरसार, ता. वरोरा, सावरी, ता.चिमुर)

समितीने दिनांक २९ डिसेंबर, २००७ रोजी जिल्हा परिषद चंद्रपूर येथे भेट देऊन सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक १ मधील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम व दुरुस्ती यांसदर्भातील माहिती घेत असताना समितीने अशी विचारणा केली की, कोसरसार, सावरी आणि बिरकर या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती निर्लेखणाचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय, त्यावर संबंधितांनी असा खुलासा केला की, कोसरसार प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम नुकतेच करण्यात आले. सदर काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने इमारत बांधत असतानाच ती पडली त्यामुळे त्याचे हस्तांतरण आरोग्य खात्याला करण्यात आलेले नाही. सन १९८७-८८ मध्ये सदर इमारतीच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली व तेव्हापासून सदर कामावर एकूण १० लाख ९१ हजार रुपये एवढा खर्च झालेला आहे. नंतरच्या कालावधीत सन १९९५-९६ च्या सुमारास इमारतींना तडे जाण्यास सुरुवात झाली पुढे काम पूर्ण न केल्याने ती तशीच पडून राहिली. त्यावर समितीने इमारतीची सद्यस्थिती काय आहे अशी विचारणा केली, त्यावर असे सांगण्यात आले की, इमारत पूर्णपणे पाडण्यात आली असून विभागीय चौकशी करण्यात आली तत्कालीन कार्यकारी अभियंता आणि शाखा अभियंता यांच्याकडून ३ लाख ६३ हजार आणि २ लाख रुपयांची रिकव्हरी झालेली आहे उपअभियंता यांची विभागीय चौकशी सुरु आहे. त्यावेळी श्री. भाडे व नितनवरे नावाचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे कार्यरत होते. कामाची तपासणी करण्यात आली त्यावेळी त्यामध्ये काळी माती मिसळण्यात आल्याचे दिसून आले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, इमारत पाडण्यास कोणी परवानगी दिली त्यावर असे सांगण्यात आले की, सर्वसाधारण सभेत निर्णय घेण्यात येऊन इमारत पाडण्यात आली. दुसरे पी.एच.सी. केंद्र सावरी ता. चिमुरमध्ये आहे ते हस्तांतरित झालेले आहे त्या इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. भिंतींना मोठे तडे गेलेले आहेत चिमुरला एक उपकेंद्र आणि दोन आयुर्वेदिक दवाखाने आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमध्ये ठराव न करता इमारत कशी पाडण्यात आली त्यावर असे सांगण्यात आले की, सदर कारवाई बांधकाम

विभागाने केलेली आहे. इमारत मैदानाच्या मध्यभागी होती व मोडकळीस आली होती. मैदानात सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला व त्यास बरीच गर्दी जमणार होती म्हणून अपघात होऊ नये यादृष्टीने इमारत पाडण्यात आली.

उपरोक्त **माहिती संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने खालील मुद्दयांबाबत माहिती मागविली.**

अ) कोसरसार व सावरी या दोन्ही ठिकाणच्या प्रा.आ.केंद्राच्या इमारती आरोग्य खात्याकडे हस्तांतरीत न करण्याची कारणे काय आहेत ? याबाबत सद्य:स्थिती काय आहे?

ब) सदर इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे या प्रकरणी कोणते अधिकारी जबाबदार आहेत. त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जि.प. चंद्रपुरकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

कोसरसार येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बांधकाम पुर्ण झ ााल्यानंतर पाणी पुरवठयाची सोय करुन न दिल्याने आरोग्य खात्याने हस्तांतरीत करुन घेतली नाही. सदर बांधकामाची चौकशी अंती सदर इमारत वापरण्यायोग्य नाही असा निष्कर्ष काढला.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई क्रमांक/पिएसी ३५०५/४५८/प्रक्र ९२/आ-५/दिनांक १ ऑगस्ट, २००६ अन्वये नविन इमारत बांधकामास मंजुरी प्राप्त झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र कोसरसार संकुल बांधकामाचे रु. ७४.४१ लक्षचे अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजुरी प्रदान करुन बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत प्रा.आ.केंद्र इमारतीचे पायव्याचे खोदकाम सुरु आहे.

सदर इमारतीचे निकृष्ट बांधकामास खालील शाखा अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता जबाबदार आहे.

१. श्री. डी.एन.जिवतोडे, शाखा अभियंता

२. श्री. ए.डी.टेंभेकर, कार्यकारी अभियंता (से.नि)

३. श्री. व्ही.जी.पटेल, उप अभियंता २

४. श्री. डी.एन.पवनीकर, उप अभियंता (से.नि)

५. श्री. ए.एल.नितनवरे, उप अभियंता

६. श्री. डी.एन.लांबाडे, कार्यकारी अभियंता (से.नि)

७. श्री. जी.के.पोरंडवार, कार्यकारी अभियंता (से.नि)

जबाबदार अधिकाऱ्यांवर केलेली कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

१. श्री.डी.एन.जिवतोडे, शाखा अभियंता - यांना निलंबित करण्यात आले. त्यांचेकडुन बांधकामावर झालेल्या एकुण खर्चाच्या (रु. १०,९१,९५५/-) १/३ इतक्या रकमेचे रु. ३,६३,९८५/- वसुली करण्याचे आदेश पारित करण्यात आले. दरम्यान श्री. डि.एन.जिवतोडे, शाखा अभियंता अपघाती मृत्यु पावल्याने त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतनातुन माहे सप्टेंबर, २००८ पर्यंत रु. २,९३,९८९/- वसुल केले असुन उर्वरित रक्कम रु. ६९,९९६/- दरमहा रु. २०००/- कुटुंब निवृत्ती वेतनातुन कपात करण्यात येत आहे.

याशिवाय या प्रकरणात तत्कालिन उप अभियंता व कार्यकारी अभियंता हे सुध्दा समप्रमाणात जबाबदार असल्याने त्यांचेकडुन बांधकामावर झालेल्या एकुण खर्चाच्या
(रु. १०,९१,९५५/-) २/३ रक्कम म्हणजेच रु. ७,२७,९७०/- वसुल करण्याचे आदेश मा. आयुक्त नागपुर विभाग नागपुर यांनी दिले.

तथापि वरिल आदेशानुसार निकृष्ट बांधकामास जबाबदार खालील तीन उप अभियंता व तीन कार्यकारी अभियंता यांचेकडुन वसुल करण्याबाबतची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

१) श्री. ए.डी.टेंभेकर, का.अ.(से.नि.) सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी लोटून गेल्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची व वसुलीची कार्यवाही करता येत नाही.

२) श्री. व्ही.जी.पटेल, उप अभियंता - शिस्तभंगविषयक अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांचे आदेश दि. २०.९.२००८ अन्वये आरोप सिध्द न झाल्याने दोषमुक्त करण्यात आले आहे.

३) श्री. डि.एन.पवनीकर, उप अभियंता (से.नि.) - सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी लोटून गेल्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची व वसुलीची कार्यवाही करता येत नाही.

४) श्री.ए.एल.नितनवरे, उप अभियंता - यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु असून निकालाअंती यांचे कालावधीत झालेल्या कामाची रक्कम रु. ३२५०५४/- पैकी २/३ रक्कम रु. २१६७०२/- वसुल करण्यात येईल. तथापि, विभागीय चौकशीचा अंतिम अहवाल सद्यस्थितीत अप्राप्त आहे.

५) श्री. डी.एन.लांबाडे, का.अ. (से.नि.) हे मृत्यु पावल्यामुळे त्यांचेकडून वसुलीची कार्यवाही करता येत

नाही.

६) श्री. जी.के.पोरंडवार, का.अ. (से.नि.) सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी लोटून गेल्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची व वसुलीची कार्यवाही करता येत नाही.

करिता रु. ५११२६८/- रक्कम दोषी अधिकारी मृत्यु/सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी झ ाल्यामुळे त्यांचेकडून वसुल करता येत नसल्याने सदर रक्कम शासनाकडून क्षमापित करणेस कळविण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र सावरीची इमारत आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तथापि, सदर इमारतीची पाहणी केली असता इमारतींना भेगा पडलेल्या असल्याने व दुरुस्तीकरणे योग्य नसल्याने तसेच भविष्यात होणारा धोका टाळण्याच्या दृष्टीने सदर इमारतीचा वापर करणे थांबवून दिनांक १.९.२००७ ला प्राथमिक आरोग्य केंद्र आयुर्वेदिक दवाखान्याचे जुन्या इमारतीत हलविण्यात आले. सद्यस्थितीत सदर इमारतीत प्राथमिक आरोग्य केंद्राचे कामकाज सुरु आहे.

सदर इमारतीचे बांधकामाचे वेळेसे पुढील अधिकारी/कर्मचारी कार्यरत होते

१) श्री. डि.एन.लांबाडे, कार्यकारी अभियंता (से.नि.)

२) श्री. जी.के.पोरंडवार, कार्यकारी अभियंता (से.नि.)

३) श्री. ए.के.गांधी, उप विभागीय अभियंता (से.नि.)

४) श्री. व्ही.जी.पटेल, उप विभागीय अभियंता (से.नि.)

५. श्री. डी.एन.पवनीकर, उप विभागीय अभियंता (से.नि.)

६. श्री. पी.के.राजपुत, शाखा अभियंता (कार्यरत)

७. श्री. पि.के.नौकरकर शाखा अभियंता (से.नि.)

सदर इमारतीच्या बांधकामांना भेगा येणे व त्या वापरणेयोग्य न राहणे याकरिताच्या कारणांची तपासणी करण्याची आवश्यकता आहे. यास्तव मातीची तपासणी पायव्याची तपासणी व बांधकामाचे संकल्पन गुणवत्ता तपासणी इत्यादीकरिता जिल्हा परिषदकडे तज्ञ यंत्रणा नसल्याने खाजगी तांत्रीक तज्ञ सल्लागाराकडुन सदरची तपासणी करण्याचे प्रस्तावित आहे.

वरील तपासणी झाल्यानंतर व दोषी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सचिवांची साक्ष :-**

समितीने उपरोक्त माहितीच्या आधारे दिनांक ९ जून २०१० रोजी विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी असा खुलासा केला की, कोसरसार येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठयाची सोय करुन न दिल्याने आरोग्य खात्याने इमारत हस्तांतरित करुन घेतली नाही. सदर बं ाधकामाच्या चौकशीअंती सदर इमारत वापरण्यास योग्य नाही असा निष्कर्ष काढण्यात आला या प्रकरणी जिल्हापरिषदेच्या शाखा अभियंत्यावर कारवाई झालेली आहे. त्यांच्याकडून १०,९१,९५५/- रुपये इतका एकूण खर्चाच्या १/३ म्हणजे रु. ३,६३,९८५/- इमक्या रकमेची वसुली करण्याचे आदेश पारित करण्यात आले. त्यानंतर ते मरण पावले त्यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनातून माहे सप्टेंबर, २००८ पर्यंत रु. २,९३,९८९/- वसूल केलेले आहेत. अन्य अधिकारी हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. या प्रकरणातील जवळपास सर्व अधिकारी निवृत्त झालेले आहेत. नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीस मंजुरी मिळालेली असून इमारतीचे बांधकाम ३० जून पर्यंत पूर्ण होईल व त्यानंतर ती आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर पुढे सचिव सार्वजनिक बांधकाम यांनी असा खुलासा केला की, या प्रकरणातील श्री.डी.एन.जिवतोडे शाखा अभियंता हे मृत्यु पावले आहेत. श्री. ऐ.डी.टेंभेकर कार्यकारी अभियंता हे सेवानिवृत्त होवून ४ वर्षाचा कालावधी लोटून गेल्यामुळे त्यांच्यविरुध्द विभागीय चौकशीची व वसुलीची कार्यवाही करता येत नाही. इमारतीचे बांधकाम दलदलीच्या भागात झाल्यामुळे पायामध्ये भेगा पडल्या होत्या त्यामुळे इमारत वापरात येऊ शकणार नाही असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यामुळे ज्यांनी पायाचे बांधकाम केले त्यांना या प्रकरणी जबाबदार धरण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री. टेंभेकर यांची चौकशी झाली नाही. तसेच ते सेवानिवृत्त होऊन ४ वर्षे झाली होती. श्री.जी.के.पोरंडवार, कार्यकारी अभियंता यांनी पायाच्या वरचे बांधकाम केले होते. त्यामुळे त्यांची चौकशी झाली नाही. श्री. चांदेकर यांची देखील चौकशी झाली नाही. श्री.गांधी हे १९९४ मध्ये मृत्यु पावले. त्यांची चौकशी झाली नाही. श्री. पटेल, उप अभियंता यांची अधीक्षक अभियंत्यामार्फत चौकशी करण्यात आली. त्यांच्या विरुध्दचे आरोप सिध्द न झाल्याने त्यांना दोषमुक्त करण्यात आले. श्री. पवनीकर, उपअभियंता हे १९९२ मध्ये सेवानिवृत्त झाले. ते सेवानिवृत्त होऊन ४ वर्षाचा कालावधी उलटून गेल्यामुळे नियमानुसार त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची व वसुलीची कारवाई करता येत नाही. श्री. नितनवरे, उप अभियंता यांची अधीक्षक अभियंत्यामार्फत चौकशी झाली.

विभागीय चौकशीमध्ये ते दोषमुक्त ठरले आहेत. श्री. जिवतोडे शाखा अभियंता यांच्याकडुन रु. ३,६३,९८५/- इतक्या रकमेची वसुली करण्यात आली. त्यानंतर सचिव सार्वजनिक आरोग्य यांनी असे सांगितले की, सावरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीस भेगा पडल्यामुळे त्या इमारतीचा वापर करणे थांबविण्यात आले आहे. या निमित्ताने त्यांनी अशी सूचना केली की, इमारतीचे बांधकाम योग्य ठिकाणी आणि योग्य प्रकारे होते किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी क्वॉलिटी कंट्रोलचे एक युनिट जिल्हा परिषदेमध्ये असणे आवश्यक आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, प्रत्येक झोनला क्वॉलिटी कंट्रोलचे कार्यालय असते. त्यांना कळविल्यानंतर ते तपासणीसाठी येतात. त्यावर सचिव सार्वजनिक बांधकाम यांनी असे सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्वॉलिटी कंट्रोल विभाग आहे. क्वॉलिटी कंट्रोल विभागाला शासनाने मापदंड घालून दिलेले आहेत. या मापदंडानुसार त्यांनी चालू असलेली १९१ कामांची तपासणी करावयाची आहे. जिल्हा परिषदेच्यार अखत्यारीतील विविध इमारती, पूल इत्यादी कामांची तपासणी करण्याकरिता जिल्हा परिषदेकडे स्वतंत्र तपासणी कक्ष नाही, नवीन बांधण्यात आलेल्या एखाद्या इमारतींची तपासणी करावयाची असल्यास आरोग्य खात्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र लिहिण्यात येते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागास पत्र लिहून त्यांची तपासणी करण्यात येते. जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील बांधकाम झ ालेल्या वास्तूची, तसेच रस्त्यांवर बांधण्यात आलेले पूल इत्यादी कामांची तपासण्याकरिता जिल्हा परिषदेसाठी स्वतंत्र क्वॉलिटी कंट्रोल युनिट स्थापन करण्याबाबत परवानगी द्यावी. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कोसरसार व सावरी या दोन्ही इमारतींच्या बांधकामासाठी किती रुपये खर्च आला त्यावर असे सांगण्यात आले की, पूर्वी या इमारतीसाठी १० लाख रुपयांचे एस्टिमेट होते. आता या इमारतीसाठी नव्याने पैसा देण्यात आलेला असून इमारत पूर्ण झालेली आहे. या ठिकाणी दोन इमारती होत्या त्यापैकी एका इमारतीला फाऊंडेशनमुळे १३ वर्षात क्रॅक पडले. दुसऱ्या इमारतीचे काम पूर्ण झ ाले असून तिलाही लगेच क्रॅक गेले. सन १९८८-८९ या वर्षात या इमारतीसाठी १० लाख रुपयांचे एस्टिमेट होते. आता ५४ लाख रुपयांचे एस्टिमेट आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून आले की, कोसरसार, ता.वरोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामास सन १९८७-८८ मध्ये सुरुवात करण्यात आली होती व तेव्हापासून सदर कामावर एकूण १० लाख ९१ हजार रुपये एवढा खर्च करण्यात आला.

परंतु इमारतीच्या कामास तडे जाण्यास सुरुवात झाल्याने इमारतीचे काम पूर्ण होऊ शकले नाही व ती तशीच पडून राहिली. सदर इमारतीच्या कामाची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये काळी माती मिसळण्यात आल्याचे दिसून आले. इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तत्कालीन कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी करण्यात आली. परंतु सदर प्रकरणातील जवळपास सर्व अधिकारी निवृत्त होऊन चार वर्षाचाकालावधी उलटून गेल्यामुळे शाखा अभियंता श्री.जिवतोंडे यांना वगळता इतर संबंधितावर कोणतीही कारवाई करता आली नाही. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत निर्णय घेऊन नंतर सदर इमारत पाडण्यात आली. यावरुन **सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामात अगदी सुरुवातीपासूनच दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले. वास्तविक पाहता सदर कामास सन १९८७-८८ मध्येसुरुवात झाली होती त्याचवेळी सदर काम केव्हा पुर्ण होणार याबाबतची वेळ देखील निश्चित करण्यात आली असणार परंतु सदर कामाप्रती कोणत्याही प्रकारची आस्था नसल्याने जि.प.च्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच आरोग्य विभागाने देखील अक्षम्य असे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.** सदर कामात दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करताना त्यातील जवळपास सर्व संबंधित निवृत्त होवून ४ वर्ष झाल्याने त्यांच्यावर कारवाई करता येत नसल्याचे नमूद केले आहे. शाखा अभियंता श्री.जिवतोंडे यांचे अपघाती निधन झ ाल्यानंतर त्यांच्या फॅमिली पेन्शनमधून त्यांच्या वाटयाची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही जिल्हापरिषद मार्फत केली जाणे ही बाब मानवतेच्या दृष्टीकोनातून योग्य वाटत नाही. **जिल्हा परिषद प्रशासनाने सदर प्रकरणी वेळीच कार्यवाही प्रस्तावित केली असती तर ही वेळ आली नसती व संबंधितावर कारवाई करुन रक्कम वसुल करता आली असती परंतु सदर प्रकरणी जाणीवपूर्वक उशीर करण्यात आल्याचे दिसून येते. सबब या सर्व प्रकरणात जाणीवपूर्वक विलंब लावणाऱ्या संबंधितावर तसेच निवृत्त होवून ४ वर्ष उलटल्याने कारवाई करण्यात न आलेल्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत विधी विभागाचे अभिप्राय घेवून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

सावरी, ता.चिमुर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम देखील निकृष्ट दर्जाचे झाल्याने सदर इमारत सार्वजनिक आरोग्य विभागाने हस्तांतरित करुन घेतली नाही. सदर इमारतीचे बांधकाम खाजगी तज्ञ यंत्रणेकडून परीक्षण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. होते. त्यानुसार पुढे काय झाले याबाबतची माहिती समितीला प्राप्त झाली नाही. साक्षीच्या वेळी असे देखील निदर्शनास आले की, **जिल्हापरिषदेकडे एखादे बांधकाम योग्य ठिकाणी आणि योग्य प्रकारे होते किंवा नाही याची तपासणी**

**करणारी कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे विभागीय गुणवत्ता नियंत्रण कक्षाकडून त्यांची तपासणी किंवा पाहणी करुन घेणेच प्रत्येक वेळी शक्य होत नाही. वास्तविक पाहता जिल्हापरिषदे मार्फत इमारती, पूलांचे बांधकाम, शाळांच्या वर्ग खोल्या इत्यादी कामे मोठया प्रमाणात करण्यात येत असतात. परंतु सदर कामे योग्य पध्दतीने होत आहेत किंवा कसे यांचे पर्यवेक्षण करणारी कोणतीही स्वतंत्र यंत्रणा अस्तीत्वात नसल्याने जिल्हापरिषद स्तरावर देखील गुणवत्ता नियंत्रण कक्ष स्थापन करावा अशी शिफारस समिती करीत आहे.**

**१.२ भद्रावती पंचायत समिती - विभाग प्रमुखांनी भेटी न दिल्याबाबत.**

पंचायती राज समितीने दिनांक २८ डिसेंबर २००७ रोजी पंचायत समिती, भद्रावती येथे दिलेल्या भेटीच्यावेळी, अहवाल वर्षात जिल्हा परिषद विभाग प्रमुखांनी नियमानुसार पंचायत समितीला भेटी दिल्या नसल्याचे आढळून आले होते तसेच, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या भेटींचा उल्लेख समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत नमूद केलेला नव्हता. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी पंचायत समितीला तीनच भेटी दिल्या, उर्वरित तीन विभाग प्रमुखांनी एकच भेट दिली. पंचायत समितीच्या मासिक सभेला एकही अधिकारी उपस्थित राहिलेला नाही. तसेच अन्य अधिका-यांनी भेटी दिल्याच्या तारखा समितीस भेटीच्या वेळी दिसून आल्या नाहीत. इत्यादी त्रुटी समितीला आढळून आल्या.

साक्षीच्या वेळी समितीने पंचायत समितीच्या मासिक सभेस जिल्हा परिषदेतील एकही अधिकारी उपस्थित न राहण्याची काय कारणे आहेत. तसेच, पंचायत समितीला भेटी दिलेल्या अधिका-यांनी भेटीच्या तारखा न देण्याची काय कारणे आहेत. अशी विचारणा केली असता यासंदर्भात संबंधित गट विकास अधिका-यांकडून समितीला समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही.

उपरोक्त **मुद्दयांच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हा परिषदकडून खालील माहिती प्राप्त झाली.**

| अ.क्र. | विभाग प्रमुख | पं.स.ला दिलेल्या | दिनांक |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकुण भेटी | |
| १. | मुख्य लेखा तथा वित्त अधि. | १ | ३.७.२००४ मासिक सभेच्या दिवशी |
| २. | उपमुकाअ (सा) | ३ | १६.९.०४, ५.२.०५, २४.२.०५ |
| ३. | प्रकल्प संचा.जि.ग्रा.वि.यं. | ३ | १०.६.०४, २५.८.०४, १८.३.०५ |
| ४. | शिक्षणाधिकारी (प्राथ) | १ | २४.२.२००५ |

**सचिवांची साक्ष :**

उपरोक्त मुद्याच्या संदर्भात समितीला दिनांक ९ जून, २०१० रोजीच्या मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या झालेल्या साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी अशी माहिती दिली की, पंचायती राज समितीने पंचायत समिती, भद्रावती येथे भेट दिली असता त्यावेळी भेट पुस्तीका उपलब्ध नव्हती तथापि, ती मागाहून उपलब्ध करुन देण्यात आली. त्यातील नोंदीवरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी, तसेच शिक्षणाअधिकारी, प्राथमिक यांनी ८ भेटी दिल्याचे नमूद केले आहे.

समितीच्या भेटीच्यावेळी भेट नोंदवही उपलब्ध नसणे, समितीस असत्य माहिती देणे समितीची दिशाभूल करणे याच कारणास्तव समितीस विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करावी लागलेली आहे असे सचिवांच्या निदर्शनास समितीने आणून दिले असता याबाबत खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित गट विकास अधिका-यांना समज देण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल विभागीय आयुक्ताकडे पाठविण्यात आल्याचे सांगितले. जिल्हा आरोग्य अधिका-यांनी एकदाही भेट न देण्याचे स्पष्टीकरण देताना चंद्रपूर जिल्ह्यात १५ तालुके असून खाते प्रमुखांच्या प्रत्येक पंचायत समिती भेटीचे रोष्टर निश्चित केले जाते. त्यानुसार प्रत्येक खाते प्रमुखाने पंचायत समितीस भेट देणे आवश्यक आहे. जिल्हात १५ पंचायत समित्या आहेत त्यांना त्यांनी ठराविक कालावधीत भेटी दिलेल्या नसल्या तरी शासनाच्या उद्दीष्टनुसार पंचायत समितीला भेटी दिलेल्या आहेत असे साक्षीच्यावेळी समितीस सांगितले. जिल्हा परिषदेत १३ विभाग प्रमुख आहेत त्यांचे भेटीबाबतचे रोटेशन निघते. हे लक्षात घेता त्यानुसार संबंधित अधिका-याने एखादया पंचायती समितीच्या बैठकांना हजर रहाणे आवश्यक आहे. आरोग्य

अधिका-यांनी भेट दिल्याची माहिती उपलब्ध नाही. खाते प्रमुखांचे बाकीचे दौरे नियमितरित्या होतात, पण त्यात संबंधितांना आवश्यक मार्गदर्शन झाल्याचे दिसून येत नाही याबाबत त्यांच्याकडून स्पष्टीकरण घेणे आवश्यक आहे. भेटी न देणाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्याशिवाय संबंधित अधिकारी पंचायत समितीच्या सभेला हजर राहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते हजर राहत नसतील, तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी :**

पंचायत समिती, भद्रावती येथे समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी समितीस दिलेल्या लेखी माहितीच्या आधारे घेतलेल्या साक्षीच्यावेळी मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांनी १, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (समान्य प्रशासन) यांनी -३ प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी -३ तसेच शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी -१ यांच्याव्यतीरिक्त अन्य कोणत्याही खाते प्रमुखाने पंचायत समितीस भेट दिल्याचे आढळलेले नाही. तसेच, प्रत्येक पंचायत समितीच्या मासिक सभेस भेटीबाबतची दिलेली माहिती असत्य आहे. भेटीच्या वेळी समितीस भेट नोंदवही उपलब्ध करुन दिलेली नाही व समितीस दिशाभुल करणारी उत्तरे प्राप्त झाली आहेत. जिल्ह्यात १५ तालुके असून १३ खातेप्रमुख आहेत व **त्यांचे पंचायत समिती भेटीसंदर्भात रोटेशन काढले जाते त्यानूसार एका खाते प्रमुखाने एका तरी पंचायत समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.** विभाग प्रमुख मासिक सभा वगळून बाकीचे दौरे नियमितपणे करतात. याचाच अर्थ त्यांना पंचायती समित्यांना द्यावयाच्या भेटी महत्त्वाच्या वाटत नाहीत. त्यामुळे त्या भेटी ते आवश्यक त्या गांभिर्याने घेत नाहीत अशी समितीची धारणा झालेली आहे.

पंचायत समित्यांना असलेल्या कार्यक्रमानुसार विभागप्रमुख भेटी देत नाहीत. या बैठका मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार निश्चित केल्या असतानाही या बैठकांना विभागप्रमुख अनुपस्थित राहतात हे लक्षात घेता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाची पायमल्ली केली जात आहे व याची कल्पना मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असतानाही, ते सदर बाब तितक्या गांभिर्याने घेत नाहीत ही बाब गंभीर स्वरूपाची आहे.

विहीत **केलेल्या भेटी विभाग प्रमुखांनी न देणे हे एक प्रकारे कार्यालयीन कामकाजाविषयी उदासिन असल्याचे लक्षण आहे. सबब, जे विभागप्रमुख त्यांना विहीत केलेल्या बैठकांना उपस्थित**

**राहिलेले नाहीत, त्यांच्यावर कडक कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीस तीन  महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद - वर्धा

### २.१जिल्हा परिषदेतील अफरातफर व गैरव्यवहाराची प्रकरणे.

जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधातील मार्च, २००६ अखेरपर्यंत किती प्रकरणे केव्हापासून व कोणत्या कारणाने प्रलंबित आहेत, सदर प्रकरणात किती रक्कम गुंतली आहे व त्यापैकी आतापर्यंत किती रकमेची वसुली झालेली आहे व अद्याप किती रक्कम वसुल व्हावयाची आहे. वसुली न होण्याची कारणे काय आहेत, सदर प्रकरणामध्ये किती व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आल्या व त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे इत्यादीबाबत जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरुपातील माहिती प्राप्त झाली.

जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधातील दिनांक ३१ मार्च, २००६ अखरेपर्यंत एकूण १३ (तेरा) प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रकरणात एकूण ५८,५१,१३०/- रक्कम गुंतली असून आतापर्यंत रु.२,८८,३०६/- रक्कम वसुल झाली आहे व अद्याप रक्कम रु.५५,६२,८२४/- वसुल व्हावयाची आहे. तसेच ग्रामसेवकाकडील एकूण ५४ (चोपन्न) प्रकरणे प्रलंबित असून त्यात रु.५५,८३,८११/- रक्कम गुंतली असून आतापर्यंत रु.११,४४,०५०/- वसुल झाले व रु.४४,३९,७६१/- रक्कम वसुल व्हावयाची आहे. सदर प्रकरणात वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

समितीने दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ रोजी जिल्हा परिषद, वर्धा येथे भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने श्री.एम.बी. बरडे, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी भविष्यनिर्वाह निधीच्या रक्कमेचा भरणा न केल्याने त्यावरील व्याजाची रु.३,०३,७०१ रक्कमेची वसुली करणे याबाबतच्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी या प्रकरणाचा न्यायालयात पाठपुरावा सुरु आहे असे सांगितले. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी एक महिन्यामध्ये आढावा घेऊन विधी विभागाचे मत घ्यावे आणि वसुलीसंबंधी कालबध्द कार्यक्रम आखावा. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यामुळे या प्रकरणाच्या निकालास विलंब होत

आहे काय याचीही माहिती घेण्यात यावी व कोर्टात प्रलंबित असलेल्या प्रकरणासंबंधी त्या त्या विभागाच्या प्रमुखावर जबाबदारी टाकण्यात यावी.

समितीने पुढे श्री. एस.डी.किटे शाखा अभियंता यांनी घरकुलांच्या कामात केलेली अफरातफर तसेच लोखंड चोरी प्रकरण याबाबतची माहिती विचारली असता असा खुलासा करण्यात आला की, पहिल्या प्रकरणात वसुली करण्यात येत असून ३०,६३२/- रुपयांपैकी ६,१२६/- रुपये वसुल करण्यात आले आहेत व सदर कारवाईस दोन महिन्यापासून सुरुवात करण्यात आली आहे.

डांबर खरेदीमध्ये श्री.एस.एन.जोशी, का.अ.बांधकाम आणि इतरांनी १४ लाख ९२ हजार रुपयांचा केलेला घोटाळा व श्री. सायकार यांनी रस्त्याच्या व इतर कामात २४ लाख ५४ हजार रुपयांचा केलेला अपहार या प्रकरणासंदर्भात कार्यकारी अभियंता, बांधकाम यांनी असा खुलासा केला की, डांबर खरेदीबाबत दिनांक १५.२.२००० रोजी हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पारेशन लिमिटेड, मुंबई यांना डांबर पुरविण्याबाबत आदेश देण्यात आले होते व आदेशासोबत रुपये १९,७१,४४४/- रुपयांचा डी.डी. दिनांक २१.२.२००२ अन्वये जमा केला होता व डांबराच्या वाहतुकीसंबंधी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मे.युनायटेड एम्पेक्स, नागपूर यांच्या कमी दराच्या निविदा स्वीकारुन त्यांना वाहतुकीचा आदेश दिलेला होता त्यानुसार दिनांक १९.५.२००० पर्यंत ३५५ ड्रममध्ये ५४.४३९ मे.टन डांबर प्राप्त झाले होते. परंतु उर्वरित डांबर विभागाला प्राप्त न झाल्यामुळे वाहतुकदारांकडे वारंवार चौकशी करण्यात आली, परंतु त्यांनी कोणताच खुलासा केला नाही. त्यामुळे काही तरी घोटाळा झाला असल्याची शंका आल्याने विभागाने दिनांक ६.१२.२००० रोजी पोलीस स्टेशन, वर्धा येथे तक्रार दाखल करण्यात आली व त्यात मे.युनायटेड इम्पेक्स, नागपूर यांनी डांबराबाबत अफरातफर केल्याचे उघडकीस आले. सदर प्रकरणाची शासनाने दखल घेऊन गुन्हे अन्वेषण विभाग यांची चौकशी करिता नियुक्ती केली. त्यांनी केलेल्या चौकशीत रुपये १४,९२,४५१/- इतका घोटाळा उघडकीस आल्याने पोलीस स्टेशन, वर्धा येथे वाहतुकदारावर कलम ४०५, ४०६ व ४०७ अन्वये गुन्हा रजिस्टर झाला. या प्रकरणी दोन अधिकारी व एक वरिष्ठ सहाय्यक (भांडारपाल) व वाहतुकदार यांना अटक करण्यात येऊन जामिनावर सोडण्यात आले. श्री.हुकूम, वरिष्ठ सहाय्यक (भांडारपाल) यांना दिनांक १३.१२.२००० रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले. तसेच कार्यकारी अभियंता आणि उप अभियंता हे सुध्दा चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यामुळे त्यांना देखील निलंबित करण्यात आले. तसेच दिनांक २१.९.२००२ रोजीच्या शासनाच्या पत्रान्वये प्रादेशिक विशेष अधिकारी, यांचेकडे उप अभियंता श्री.एन.जी.गांधी व

श्री.एस.एन.जोशी, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, वर्धा यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी सदर प्रकरण सन २००२ मध्ये विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आले.

समितीने श्री.एन.एस.सायकार, शाखा अभियंता यांना बडतर्फ करण्यात आले व शासनाकडून त्यांची मालमत्ता ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात येवूनही त्यांच्यावर तशी कार्यवाही का करण्यात आली नाही अशी विचारणा केली, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ११ सप्टेंबर,२००६ ला आदेश मिळाले, व दिनं ाक १४.११.२००६ रोजी सदर प्रकरण जिल्हाधिकाऱ्याकडे आर.आर.सी. वसुलीसाठी पाठविले आहे असे समितीला सांगितले. समितीने श्री.जे.एम.धांदे, शाखा अभियंता यांनी कामात भ्रष्टाचार व अग्रीमाचे समायोजन करुन रु. ६,२८,६०२/- रक्कमेचा गैरव्यवहार केलेला आहे, याबाबत काय परिस्थिती आहे, अशी विचारणा केली. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री.धांदे, शाखा अभियंता यांना सक्तीने सेवानिवृत्त करुन वसुली करण्याचे आदेश दिले होते. त्यासंदर्भात त्यांनी अप्पर आयुक्तांकडे दिनांक १६.११.२००५ रोजी अपील केले. त्यामुळे त्यांना उपदान दिले नाही असे सांगितले.

शिक्षणाधिकाऱ्यांनी अर्थिक मागासवर्गाच्या सवलतीच्या रक्कमेची अफरातफर करुन रु.१.४० लक्ष रक्कमेचा गैरव्यवहार केलेला आहे. याबाबतची सद्यःस्थिती काय आहे याबाबत समितीने विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी या प्रकरणामध्ये श्री.पी.के.ठवरे, श्री.के.के.बावणे यांचा समावेश आहे. इतर कर्मचाऱ्यांमध्ये कनिष्ठ सहाय्यक श्री.एच.पी.बुचे, कनिष्ठ सहाय्यक श्री.डी.जे.जुनघरे, यांचा समावेश आहे. तसेच श्री.बी.के.पराते, श्री.एम.जे.उबरखंडे यांचाही समावेश आहे असे सांगितले असता त्यावर समितीने त्यांच्यापैकी सध्या जिल्हा परिषद, वर्धा येथे सेवेत कोण आहेत, अशी पृच्छा केली त्यावर शिक्षणाधिकारी यांनी श्री.बुचे आणि जुनघरे जिल्हा परिषदेचे कर्मचारी आहेत. श्री.बुचे हे आरोग्य विभागात आहेत आणि श्री.जुनघरे हे पंचायत समिती देवळी येथे कार्यरत आहेत असे सांगितले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, इबीसी सवलतीची रक्कम रुपये ३३.५५ लक्ष रुपयांचा अपहार करण्याचा प्रयत्न केला, असे नमूद करण्याचे कारण काय आहे त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, या प्रकरणी संबंधितांना पकडण्यात आले व त्याबाबतचे चेक पेमेंट थांबिवण्यात आले तसेच श्री.बुचे आणि श्री.जुनघरे यांना त्यावेळी निलंबित करुन त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले व ३ वर्षाकरिता दोघांची वेतनवाढ रोखण्यात आली, तसेच श्री.ठवरे

व श्री.के.के.बावणे यांना निलंबित केले त्यांच्यापैकी श्री.ठवरे हे सेवानिवृत्त झाले व श्री.बावणे हे गोंदिया येथे शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त महितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्याबाबतची माहिती मागविली.

(१) जिल्हा परिषदेकडे मार्च, २००६ पर्यंत प्रलंबित असलेल्या अफरातफरीच्या व गैरव्यवहाराच्या एकूण १३ प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

(२) सदर गैरव्यवहाराच्या वेगवेगळया प्रकरणात शिस्तभंग विषयक प्राधिकरण, विभागीय आयुक्त व न्यायालयांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी वेळेत न करणाऱ्या संबंधितावर काय कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे.

जिल्हा परिषद,वर्धा यांच्याकडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती प्राप्त झ ाली.

जिल्हा परिषदेकडील मार्च, २००६ पर्यंत प्रलंबित असलेल्या अफरातफर व गैरव्यवहाराच्या १३ प्रकरणाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

**(१) ग्राम पंचायत विभाग :**

पंचायत विभागांतर्गत एकूण ५४ प्रकरणामध्ये ५७ व्यक्ती जबाबदार होत्या. त्यामध्ये ग्रामसेवक ५४ व सरपंच ३ समाविष्ठ होते. सदर ५४ प्रकरणामध्ये वसुली आदेश देण्यात आले आहेत. एकूण ५४ प्रकरणामध्ये ५५८३८११/- एकूण वसुलपात्र रक्कम होती. त्यापैकी १८१८८३८/- रुपये वसुल झाले असून उर्वरित ३७६४९७३/- रुपये वसुली सुरु आहे. एकूण ५४ प्रकरणामध्ये वसुली पूर्ण झालेली प्रकरणे १६ आहे, न्यायप्रविष्ठ प्रकरणे-१ आहे, आर.आर.सी. करीता पाठविण्यता आलेली प्रकरणे ८ असून वसुलीची प्रक्रिया सुरु असलेली प्रकरणे २९ आहे.

**(२) इतर विभाग :**

जिल्हा परिषदेकडील ग्राम पंचायत विभागातील अफरातफरीची प्रकरणे वगळून इतर विविध विभागांतर्गत अफरातफरीच्या एकूण १२ प्रकरणामध्ये एकूण १८ व्यक्ती जबाबदार होत्या. त्यामध्ये एकूण ५८,५१,१३०/- इतकी रक्कम वसुलपात्र होती. त्यापैकी ८,६०,५०३/- रुपये वसुल झाले असून उर्वरीत ४९,९०,६२७/- रुपये वसुली सुरु आहे.

वरील एकूण १२ प्रकरणापैकी ३ प्रकरणात वसुली पूर्ण झालेली आहे. ३ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. १ प्रकरण आर.आर.सी. करिता पाठविण्यात आलेले आहे. १ प्रकरण शासन स्तरावर पाठविण्यात आले आहे व ४ प्रकरणात वसुलीची प्रक्रिया नियमीत सुरु आहे.

**सचिवांची साक्ष :**

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक ६ जुलै, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने प्रलंबित असलेल्या अफरातफर व गैरव्यवहाराच्या १३ प्रकरणांची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली. त्यासंदर्भात सचिव ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषदेमध्ये पंचायत विभागाअंतर्गत गैरव्यवहाराच्या एकूण ५४ प्रकरणांमध्ये ५७ व्यक्ती जबाबदार होत्या त्यात ५४ ग्रामसेवक व ३ सरपंच यांचा समावेश होता. अफरातफर व गैरव्यवहारामध्ये गुंतलेली रक्कम वसुल करण्याचे तीन भाग असतात त्यानुसार जे कर्मचारी गैरव्यवहारास जबाबदार होते त्यांच्या पगारातून वसुली सुरु करण्यात आली आहे. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर जी रक्कम द्यावयाची असते त्यातूनसुध्दा वसुली केली आहे. गैरव्यवहाराची रक्कम वसुल करण्यासाठी ती रक्कम सुध्दा कमी पडली तर त्यांच्या मालमत्तेतून रक्कम वसुल करण्यासाठी त्यांची प्रकरणे आर.आर.सी. करीता पाठविलेली आहेत. या सर्व प्रकरणांत चौकशी होवून रु.५५,८३,८११/- वसुलपात्र रक्कम होती त्यापैकी आतापर्यंत रु.१८,१८,८३८/- वसुली झाली असून उर्वरित रु.३७,६४,९७३/- वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे. ५४ पैकी १६ प्रकरणातील १८ व्यक्तींकडून पूर्ण वसुली झालेली आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये हप्त्याहप्त्याने वसुली सुरु आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वास्तविक पाहता गैरव्यवहार करणाऱ्या व्यक्तीने इतकी वर्षे शासनाचा पैसा वापरलेला असल्यामुळे अशा व्यक्तींकडून व्याजासह रक्कम वसुल करावयास पाहिजे. त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असे सांगितले की, या प्रकरणामध्ये सर्वच ठिकाणी रोख रकमेचा अपहार/गैरव्यवहार करण्यात आलेला नाही काही ठिकाणी कामाच्या मूल्यांकनामध्ये फरक पडला आहे काही प्रकरणात पनिशमेंट रिकव्हरी आहे काही प्रकरणात काम पूर्ण झाल्याचे दाखवून रक्कम उचललेली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५७ व्यक्तींनी किती रकमेचा अपहार केला आणि किती रक्कम त्यांच्याकडून वसुल करण्यात आली तसेच त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली याबाबत माहिती विचारली असता सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असा खुलासा केला की, गैरव्यवहार करणाऱ्यांपैकी काही व्यक्तींना बडतर्फ केले असून,

काही व्यक्तींवर पोलीस केसेस दाखल केल्या आहेत व त्या व्यक्तीकडून अपहारित रकमेची वसुली सुध्दा करीत आहोत.

इतर विभागात घडलेल्या गैरव्यवहारातील पहिले प्रकरण वित्त विभागातील आहे. वित्त विभागातील श्री.एम.बी.बरडे, कनिष्ठ सहायक (लेखा) यांच्याकडून ३,०३,७०१/ रु. वसूल करावयाचे होते. त्यांच्याकडून ३१,६००/- रु. वसूल केल्यानंतर सन २००६ मध्ये श्री.बरडे यांचा मृत्यु झ ाला. त्यावेळी त्यां च्याकडून २,७२,१०१/- रु. वसूल करावयाचे होते. त्यामुळे मयत कर्मचाऱ्याच्या पत्नीला मिळणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनातून उर्वरित अपहारित रक्कम वसूल करण्याचे आदेश पारित केले होते. परंतु मयत कर्मचाऱ्याची पत्नी श्रीमती अर्चना बरडे यांनी त्या आदेशाविरुध्द उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. त्यानंतर उच्च न्यायालयाने सदरहू रक्कमेच्या वसुलीस स्थगनादेश दिला असून, न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत वसुली करु नये असे सांगितले आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वास्तविक पाहता, आपण मयत कर्मचाऱ्याच्या पत्नीला मिळणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुली करु शकत नाही. समितीने पुढे अशी विचारणा केली की, श्री.बरडे यांना सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या रकमेतून किती रक्कम वसूल केली आहे. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा यांनी असे सांगितले की, श्री. बरडे यांचे दि. २७ सप्टेंबर, २००६ रोजी निधन झाले. त्यावेळी त्यांच्याकडून रु. २,५४,३६६/- वसूल करावयाचे होते. परंतु त्यांच्या पत्नीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्यामुळे, उच्च न्यायालयाने ऑर्डर दिली की, जोपर्यंत न्यायालयाचा निर्णय लागत नाही तोपर्यंत श्रीमती बरडे यांना मिळणाऱ्या कुटुंब निवृत्ती वेतनातून वसुली करु नये. त्यामुळे सद्यःस्थितीत या रकमेच्या वसुलीला स्थगिती आहे. श्री.बरडे हयात असताना दरमहा रु. १२६५/- प्रमाणे त्यांच्या वेतनातून ४९,३३५/- रु. वसूल करण्यात आले होते.

सचिव, ग्रामविकास विभाग यांनी पुढे असा खुलासा केला की, दुसरे प्रकरण हे संयुक्त प्रकारचे होते. यामध्ये तीन व्यक्ती गं ुतलेल्या होत्या. त्यांच्याकडून ३ लाख ३ हजार रुपये वसुली झाली आहे. यामध्ये गं ुतलेल्या तिन्ही लोकांना सारख्याप्रमाणात वसुलीची रक्कम ठरवून दिली होती. त्यानुसार दोघांकडून वसुली करण्यात आली असून, एका अपहारित व्यक्तीचा मृत्यु झाल्यामुळे वसुली बाकी आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम कापल्यानंतर ती भविष्य निर्वाह निधीच्या खात्यामध्ये जमा केला पाहिजे. परंतु या कर्मचाऱ्यांनी ती रक्कम वेळेत भरली नाही. त्यामुळे पात्र कर्मचारी व्याजापासून वंचित राहिले. त्यामुळे या तीन कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५४ प्रकरणामध्ये अपहार करणाऱ्या व्यक्तींवर विभागाने काय कारवाई केली आहे तसेच सदर प्रकरणातील सर्व लोकांनी रकमेचा अपहार केला होता काय, त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, अपहारित प्रकरणांतील ५४ प्रकरणांपैकी १६ प्रकरणांत पूर्ण वसुली झाली आहे. एक प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ३ व्यक्तींना सेवेतून बडतर्फ केले असून, १६ व्यक्तींना सेवामुक्त केले आहे. तसेच १३ व्यक्तींना सक्ती सेवानिवृत्ती दिली आहे. त्याचप्रमाणे १७ व्यक्तींच्या तीन-चार वेतनवाढी रोखल्या आहेत. शिवाय काही लोकांना मूळ वेतनावर आणले आहे. काहींनी रोख रकमेचा अपहार केला होता. काही ठिकाणी कामाच्या मुल्यांकनमध्ये फरक पडला आहे, काही प्रकरणात पनिशमेंट रिकव्हरी आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झ ालेले नसताना देखील काम पूर्ण झाल्याचे दाखवून पैसे उचललेले आहेत. यातील काही बाबी लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आल्या आणि काही प्रकरणी विभागाने स्वतःहून कार्यवाही केली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, इतर विभागामध्ये जो गैरव्यवहार झालेला आहे त्यातील तीन प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे नमूद केले आहेत. न्यायप्रविष्ट प्रकरणातील व्यक्ती सेवेत आहेत काय त्यावर असे सांगण्यात आले की, गैरव्यवहाराच्या इतर विभागाअंतर्गत येत असलेले बांधकाम विभागातील पहिले प्रकरण लोखंड चोरीला गेल्यासंदभार्तील होते. याप्रकरणी संबंधित असलेले श्री. किटे, शाखा अभियंता यांची विभागीय चौकशी करण्यात आली व चौकशीअंती लोखंड चोरीला गेले नसल्याचे सिध्द झाले. श्री.किटे यांना शिक्षा देण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडून संपूर्ण रक्कम वसूल केली आहे.

तसेच दुसऱ्या प्रकरणात श्री.जोशी, तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.गांधी, तत्कालीन उप अभियंता व श्री.हुकूम, तत्कालीन वरिष्ठ सहायक यांचा समावेश होता. श्री.जोशी व श्री.गांधी यांच्याविरुध्द प्रादेशिक विशेष चौकशी अधिकारी, नागपूर यांच्यामार्फत विभागीय चौकशी सुरु आहे. श्री.हुकूम यांची चौकशी करुन, त्यांना निलंबित केले होते आणि त्यानंतर त्यांची वेतनवाढ कायमची बंद केली आहे. सन २००३ पासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित आहे. हे दोन्हीही अधिकारी सद्यःस्थितीत निवृत्त झाले आहेत. बांधकाम विभागाशी संबंधित असलेले गैरव्यवहाराचे तिसरे प्रकरण श्री.एन.एस.सायंकार, शाखा अभियंता यांच्याशी संबंधित आहे. श्री.सायंकार यांना विभागीय चौकशी केल्यानंतर सेवेतून बडतर्फ केले आहे. जिल्हाधिकारी, वर्धा यांच्यामार्फत २४,५४,१०२/-रु. च्या वसुलीसाठी आर.आर.सी. प्रक्रियेद्वारे वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, इतर विभागांतर्गत घडलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी १ प्रकरण शासन स्तरावर पाठविण्यात आल्याचे माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केले आहे. हे प्रकरण शासन स्तरावर कशासाठी पाठविण्यात आले त्यावर असे सांगण्यात आले की, लघु सिंचन विभागात श्री.विजय कुकडे, रोखपाल म्हणून कार्यरत होते. त्यांनी केलेल्या अफरातफरीबाबतचे हे प्रकरण आहे. त्यांनी ३,७०,९४९/-रु. रकमेची अफरातफर केली होती, त्यांच्याकडुन २,९३,०३५/-रु. वसूल करण्यात आले होते. त्यांच्याकडून ७७,९१४/-रुपये अद्याप वसूल होणे बाकी आहेत. ही रक्कम शासन स्तरावर क्षमापित व्हावी म्हणून नुकताच शासन स्तरावर प्रस्ताव सादर केला आहे. त्यावर समितीने अशी पृच्छा केली की, ही रक्कम क्षमापित करण्याची करणे काय आहेत त्यावर असा खुलासा करण्यात आला की, श्री.विजय कुकडे यांनी प्रवास भत्ता, महागाई भत्ता इ. ची रक्कम बँकेत जमा न करता, त्या रक्कमेची अफरातफर केली होती. या प्रकरणी संबंधित कार्यकारी अभियंता यांना सुध्दा जबाबदार धरले होते. विभागीय चौकशीनंतर श्री.कुकडे यांच्या अंतिम वसुलीबाबतचे आदेश पारित करतांना त्यांच्याकडून वसुलीची रक्कम कमी दाखविली होती. त्यामुळे ७७,९१४/-रु.वसूल करता येत नाहीत. त्यामुळेच ही रक्कम क्षमापित करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ज्या ठिकाणी अपहारित कर्मचारी/अधिकारी मयत झ ााल्यानंतर, कुटुंबाचा प्रश्न येत असेल त्या ठिकाणी अपहारित रक्कम क्षमापित करण्यास हरकत नाही. त्यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी असा खुलासा केला की, श्री.कुकडे यांच्या प्रकरणातील रक्कम वसूल करणे शक्य नसल्यामुळे सदरहू रक्कम क्षमापित करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे व पुढे असे सांगितले की, यानंतर आरोग्य विभागातील डॉ.पी.ए.चामटे, वैद्यकीय अधिकारी यांचे प्रकरण आहे. डॉ.चामटे यांच्याकडून अपहारीत रक्कम रु. ४२,३५३/- च्या वसुली प्रकरणात मा. जिल्हा सत्र न्यायालय, वर्धा यांनी वसुली करण्याबाबत आदेशीत केले आहे. डॉ.चामटे, वै.अ. यांचा मृत्यू झ ााल्यानंतर त्यांच्या पत्नीने सदर वसुलीस संमती दर्शविली आहे सदरची वसुली त्यांच्या सेवानिवृत्ती विषयक लाभातून करण्याबाबत जिल्हा परिषद, भंडारा यांना कळविले आहे.

यानंतरचे प्रकरण श्री.वाढई, कनिष्ठ सहाय्यक यांचे असून भांडारातील साहित्य अफरातफर प्रकरणी रु.९३१०७/- वसूली निश्चित करण्यात आली असून त्यापैकी ५०,०००/- वसूल झाली असून उर्वरित रक्कम रु.४३१०७/- दर महिना त्यांच्या वेतनातून १००० प्रमाणे वसुली सुरु आहे. विभागीय चौकशीअंती देय वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

यांनतरचे प्रकरण शिक्षण विभाग (प्राथमिक) चे असून श्री.बोडखे, पंचायत समिती, आष्टी यांच्यावर शाळा बांधकामाच्या अनुदानातून रुपये ४७,२५५/- ची अफरातफर केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. विभागीय चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र. जिपव/प्राशिवि/कावि-१९८/२००७ दिनांक २६.०२.२००७ अन्वये रुपये ४७,२५५/- वेतनातून वसूल करण्यात आले, तसेच पुढील देय वेतन वाढ तीन वर्षाकरिता कायम स्वरुपी रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

यानंतरचे प्रकरण शिक्षण विभाग (माध्यमिक) चे असून इबीसी सवलतीच्या रक्कमेच्या अफरातफर प्रकरणातील रु. १,४०,०००/- पैकी रु. १,००,०००/- वसूल झाले असून उर्वरित रुपये ४०,०००/- चे वसूली संबंधाने प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. याप्रकरणात (१) श्री.बावणे, तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या ५ वेतनवाढी कायमस्वरुपी रोखण्यात आल्या आहेत. (२) श्री.ठवरे, तत्कालीन शिक्षाधिकारी (माध्यमिक) यांना समज देण्यात आली आहे. (३) श्री.उबरहांडे, तत्कालीन अधिक्षक वर्ग-२ यांचेवर ठपका ठेवण्यात आला आहे. (४) श्री.जुनघरे, कनिष्ठ सहाय्यक यांना मूळ वेतनाच्या सुरुवातीस आणून पुढील ३ वेतनवाढी कायमस्वरुपी रोखण्यात आलेल्या आहेत. (५) श्री.बुचे कनिष्ठ सहाय्यक यांना मूळ वेतनाच्या सुरुवातीस आणून पुढील ३ वेतनवाढी कायमस्वरुपी रोखण्यात आलेल्या आहेत. (६) श्री.पराते, तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे सेवानिवृत्ती वेतनातून कायमस्वरुपी २० टक्के कपात करण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

पुढील प्रकरण पशुसंवर्धन विभागातील असून श्री.आर.टी.दिग्रसे कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचेकडून अफारातफरीचे प्रकरणात रुपये ९९,६००/- वसुल करावयाचे होते. त्यापैकी रुपये ९६,३००/- आतापर्यंत वसूल झाले आहे. उर्वरित रक्कम रुपये ३,३००/- प्रतिमाह रुपये १,१००/- या प्रमाणे ३ महिन्यात कपात करण्यात येत आहे. श्री. दिग्रसे यांची विभागीय चौकशी करुन त्यांना दिनांक २७.२.२००६ अन्वये समयश्रेणीतील किमान वेतनावर आणण्यात आले आहे. वसुलपात्र रक्कम वसूल करणे व निलंबन काळ ठरविणे अशी शिक्षा देण्यात आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी :-**

समितीला प्राप्त झालेल्या एकूण माहितीवरुन असे दिसून येते की, जिल्हा परिषद, वर्धा मध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहाराच्या प्रकरणांसंदर्भात दोन भाग आहेत. एका भागात पंचायत विभागाचा तर दुसऱ्या भागात इतर विभागातील अफरातफर व गैरव्यवहारांचा समावेश आहे. ग्रामपंचायत विभागात एकूण ५४ गैरव्यवहाराच्या प्रकरणांचा समावेश असून त्यात एकूण ५५,८३,८११/- एवढी रक्कम वसूल

पात्र असून त्यात ५७ व्यक्ती जबाबदार आहेत. वसूलपात्र रक्कमेपैकी आतापर्यंत फक्त १८,१८,८३८/- एवढी रक्कम वसूल झालेली आहे व उर्वरीत रक्कम रु. ३७,६४,९७३/- ची वसूली सुरू आहे. एकूण ५४ प्रकरणांपैकी फक्त १६ गैरव्यवहाराच्या प्रकरणाच्या बाबतीत आतापर्यंत संपूर्ण वसुली झालेली दिसून येते व उर्वरीत प्रकरणाबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **वास्तविक पाहता सदर प्रकरणे ही सन २००६ पूर्वीची आहेत. समितीने जिल्हा परिषदेला भेट दे`वूनही जवळपास दोन वर्षाचा कालावधी लोटला आहे. तथापी सदर प्रकरणी करण्यात येणारी कारवाई मात्र फारच संथगतीने चालत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रकारची अफरातफर अथवा गैरव्यवहार करणा-याच्या मनात प्रशासनाबद्दल दरारा निर्माण होणार नाही, परिणामी गैरव्यवहार व अपहार करण्याच्या वृत्तीमध्ये वाढ होण्याची शक्यता नाकरता येणार नाही. तसेच सदर प्रकरणी` जिल्हा परिषद प्रशासना मार्फत दोषींवर कारवाई करण्याचे जे प्रयत्न होत आहेत व त्यात प्रशासनाला ज्या अडचणी येत आहेत त्या लक्षात घेतल्या तर असे दिसून येते की, गैरव्यवहाराच्या प्रकरणाचा निपटारा करण्यास जेवढा विलंब लागेल तेवढया अडचणी जास्त येत राहतील. सबब, उपरोक्त बाबी लक्षात घेवून समिती अशी शिफारस करीत आहे की, सदर अफरातफरीच्या व गैरव्यवहाराच्या प्रकरणावर संपूर्ण कार्यवाही करुन अपहारीत रक्कमेची वसुली व संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून निर्धारीत कालावधीत उक्त कार्यवाही करुन त्याबाबतची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठवण्यात यावी व भविष्यात अशा प्रकरणाचा निपटारा करताना वेळीच कारवाई सुरू करावी जेणेकरून भविष्यात अडचणी येणार नाहीत**

इतर विभागातील अफरातफरीची एकूण १२ प्रकरणे असून ३ प्रकरणात वसुली पूर्ण झालेली आहे व उर्वरीत प्रकरणापैकी ३ प्रकरणे न्यायप्रविष्ठ, १ प्रकरण आर.आर.सी करीता पाठविण्यात आलेले आहे, १ प्रकरण शासनस्तरावर प्रलंबित आहेत व उर्वरित ४ प्रकरणाची वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे समिती समोर आलेल्या माहिती वरुन दिसून येते.

**न्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या प्रकरणात अपहारित कर्मचारी / अधिकारी यांचे निधन झालेले आहे. अशा कर्मचारी/अधिकारी यांच्या कुटूंब निवृत्तीवेतनाच्या रक्कमेतून अपहारित रक्कम वसूल करता येणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणातील रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने अशी रक्कम क्षमापित करणाचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास हरकत नसावी अशी शिफारस समिती करीत आहे. तसेच ज्या प्रकरणात वसुलींसाठी आर.आर.सी. कार्यवाही सुरू आहे. त्याबाबतची माहिती तसेच एकूण**

**अफरातफरीच्या प्रकरणांच्या संदर्भात समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे योग्य ती कारवाई करुन त्याबाबतची माहिती देखील समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावी, अशी शिफारस समिती करीत आहे.**

प्रकरण तीन

## सोलापूर जिल्हा परिषद

### ३.१ जवाहर विहिर योजना कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांच्या विहिरींना विद्युत जोडणी देणे.

समितीने दिनांक ३० मे, २००८ रोजी सोलापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता समितीने बैठकीच्या वेळी सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने जिल्ह्यातील जवाहर विहिर योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांच्या विहिरींना विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही. विद्युत पुरवठा न केलेल्या विहिरींची संख्या वाढत चालली आहे ईत्यादीबाबत समितीने विचारणा केली असता समितीला अशी माहिती देण्यात आली की, जिल्हा परिषदेने वीज वितरण कंपनीकडे यासंबंधीचे अर्ज पाठविलेले आहेत. परंतु, वीज वितरण कंपनीकडे साहित्य उपलब्ध नसल्यामुळे विद्युत पुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यावर अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी, सोलापूर यांनी जवाहर विहिरींच्या लाभार्थ्यांना आतापर्यंत १३६० विद्युत जोडण्या दिलेल्या आहेत तर एकूण ८३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. विद्युत पुरवठ्या पासून वंचित राहिलेल्यांना विद्युत पुरवठा करण्याचे काम सुरु

आहे. कामाच्या प्रमाणात साहित्य उपलब्ध होत नव्हते म्हणून संपूर्ण कामासाठी जे काही साहित्य लागते, त्यासाठी निविदा काढण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. यापूर्वी एखादे साहित्य नसले की काम अडून रहायचे, परंतु आता तसे होणार नाही. असे समितीला सांगितले. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विद्युत जोडणीची एकूण २०२५ प्रकरणे आहेत. त्यापैकी ८३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. लाभार्थ्यांच्या विहिरींना लवकरात लवकर विद्युत जोडण्या मिळतील या दृष्टीने महावितरण कंपनी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रयत्न करावेत. त्यावर विहिरींना विद्युत जोडणी देण्याची कामे पुढील सहा महिन्यात पूर्ण होईल असे अधिक्षक अभियंता, महावितरण कंपनी यांनी समितीला सांगितले.

वरील बैठकीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, यांच्याकडून दिनांक २६ सप्टेंबर, २००८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीनुसार, रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर विहिर कार्यक्रमाखाली पूर्ण झालेल्या विहिरींपैकी विद्युत जोडण्या न केलेल्या २३८८ लाभधारकांना विद्युत जोडण्या देणेबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात आला.

१. २३८८ जवाहर विहिरींपैकी १०८० लाभार्थ्यांनी विद्युत जोडणी मिळणेसाठी विद्युत वितरण कंपनीकडे अर्ज सादर केले असून त्यापैकी ४६५ विहिरींना विद्युत जोडण्या दिलेल्या असून ४३ विहिरींना विद्युत जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

२. उपरोक्त ५०८ प्रकरणे वजा जाता उर्वरित १८८० प्रकरणे प्रलंबित असून प्रलंबित प्रकरणांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१. विद्युत वितरण कंपनीकडे २४९ प्रकरणे प्रलंबित आहेत. पैकी ११८ अर्जांना मंजूरी देण्यात आलेली नाही व १३१ प्रकरणास पैसे भरून चाचणी अहवाल प्राप्त असून विद्युत जोडणी देणेबाबत विद्युत वितरण कंपनीकडून कार्यवाही स्तरावर आहे.

२. १६३१ प्रकरणे लाभर्थी स्तरावर प्रलंबित असून पैकी १३०८ लाभार्थ्यांना विद्युत जोडणेसाठी अर्ज दिलेले नाहीत. २२९ लाभार्थ्यांनी पैसे भरलेले नाहीत. व ९४ लाभार्थ्यांनी चाचणी अहवाल दिलेला नाही.

विद्युत वितरण कंपनीकडे प्रलंबित असलेले २४९ प्रकरणामध्ये त्वरित कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणेत येत आहे. तसेच लाभार्थी स्तरावर प्रलंबित असलेल्या १६३१ प्रकरणामध्ये लाभर्थ्यांचे समक्ष भेट घेवून विद्युत जोडणीसाठी लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेणे व ते संबंधित विद्युत वितरण मंजूरीसाठी

पाठविणे, विद्युत जोडणीसाठी लाभार्थ्यांकडून पैसे भरून घेणे व चाचणी अहवाल, सादर करणेबाबत उपविभागीय स्तरावरील क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेण्यात येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या आधारे माहिती जाणून घेण्यासाठी समितीने विभागाकडून खालील मुद्यांबाबत माहिती मागविली.**

१. जवाहर विहिरींना विद्युत पुरवठा देण्यासाठी विद्युत वितरण कंपनीकडे प्रलंबित असलेल्या १८८० प्रकरणापैकी २४९ प्रकरणामध्ये कर्यवाही करण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित १६३१ प्रकरणाबाबत सद्य:स्थिती काय आहे?

जिल्हा परिषद सोलापूर कडून उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खालील माहिती प्राप्त झाली.

जवाहर विहिरींना विद्युत जोडण्या देणेकामी प्रलंबित असलेल्या १८८० प्रकरणांपैकी विद्युत वितरण कंपनीकडे प्रलंबित असलेल्या २४९ प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

१. ११६ लाभार्थ्यांना विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.

२. १३३ प्रकरणे अद्यापी प्रलंबित असून त्यापैकी ७९ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर नाहीत व ५४ लाभार्थ्यांनी चाचणी अहवाल देवूनही विद्युत जोडणी देणेबाबत कार्यवाही झालेली नाही.

लाभधारकस्तरावर प्रलंबित १६३१ प्रकणांपैकी सद्यस्थितीत ३३ लाभधारकांना विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या असून अद्यापी १५९८ प्रकरणे लाभधारस्तरावर प्रलंबित आहेत. त्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

अ) लाभधारकांनी विद्युत जोडणीसाठी अर्ज दिलेला नाही - १२६७

ब) अर्ज मंजूर परंतु लाभधारकांनी विद्युत जोडणीसाठी पैसे भरले नाहीत.२२९

क) पैसे भरले परंतु चाचणी अहवाल दिलेला नाही १०२

विद्युत जोडणीबाबत प्रलंबित प्रकरणांमध्ये कार्यवाही करण्याच्या दृष्टीने केलेले प्रयत्न खालीलप्रमाणे आहेत.

१) तालुकास्तरावर गट विकास अधिकारी व उप अभियंता, यांना संबंधीत लाभार्थी यांच्याकडून विद्युत जोडणीबाबत मागणी अर्ज भरून घेणेबाबत वेळोवेळी सुचीत केले आहे त्यानुसार त्यांनी देखील पंचायत समितीच्या मासिक सभेमध्ये संबंधीत विद्युत वितरण कंपनीचे अधिकाऱ्यांना लाभार्थ्यांकडून अर्ज

भरुन घेणे, कोटेशन देणे, व त्या अनुषंगाने विद्युत जोडणी त्वरेने देणेबाबत जाणीव करून देण्यात आलेली आहे.

२) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी, सोलापूर यांना दिनांक २२-५-२००८ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचे निजीकक्षामधे जवाहर विहिरींना विज जोडणी संबंधी बैठक घेवून शासन संदर्भ पत्र क्र.विसआ-२००३/प्र-५/रोहयो-१०दिनांक १ सप्टेंबर, २००३ नुसार जवाहर विहीर लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्याने विद्युत जोडणी देणेबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन अधिक्षक अभियंता, विद्युत महावितरण कंपनी सोलापूर यांनी त्यांचेकडील पत्र जाक्र.अअ/सोमंका/तां ५५६७ दिनांक ६-८-२००८ अन्वये त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीयस्तरावरील सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना जवाहर विहीर लाभार्थ्यांना प्राधान्य क्रमाने विद्युत जोडणी देणेबाबत सूचना दिल्याचे कळविले आहे.

३) तालूकास्तरावर संबंधीत लाभार्थी, उप अभियंता (ल.पा.) संबंधीत शाखा अभियंता (ल.पा.), विद्युत वितरणाचे अधिकारी, तालूका कृषी अधिकारी यांची एकत्रित एक दिवसाचा मेळावा घेवून लाभधारकांचे अर्ज भरून घेणे, रक्कम भरून घेणे, चाचणी अहवाल घेणे अशा प्रकारची कार्यवाही करून घेण्याच्या सूचना गट विकास अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

उपरोक्त प्रमाणे विद्युत जोडणी देणेसाठी प्रलंबित प्रकरणांमध्ये कार्यवाही व पाठपुरावा करण्यात येत आहे.

**सचिवांची साक्ष :**

समितीने उपरोक्त माहितीच्या आधारे संबंधित विभागाच्या सचिवांची दिनांक ८ जून, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने एस.टी., एन.टी. या प्रवर्गातील अल्पभूधारकांना जवाहर विहिरींचे वाटप केले जाते परंतु, या योजनेचा लाभार्थ्यांना विद्युत जोडणी वर्षानुवर्षे मिळत नाही याबाबत जवाहर विहिरींना प्राधान्याने विजेची जोडणी उपलब्ध करून देण्यात येईल का अशी विचारणा केली असता जवाहर विहिरींना प्राधान्याने विजेची जोडणी उपलब्ध करून देण्याबाबत संबंधीतांना सांगण्यात येईल असे ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

जिल्हा परिषद, सोलापूर येथे झालेल्या समितीच्या बैठकीच्या वेळी जवाहर विहिर कार्यक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या जवाहर विहिरींना विद्युत जोडणी दिलेली नसल्याने विद्युत

जोडणी न दिलेल्या विहिरींची संख्या वाढत चाललेली आहे याबाबत जिल्हा परिषदेने विज वितरण कंपनाकडे यासंबंधीचे अर्ज पाठविले असता, विज वितरण कंपनीकडे विद्युत साहित्य उपलब्ध नसल्यामुळे विद्युत जोडण्या देण्यात अडचणी निर्माण झाली होती परंतू येत्या सहा महिन्यात सर्वाना विद्युत जोडण्या देण्यात येतील अशी माहिती देण्यात आली. सोलापूर जिल्ह्यात जवाहर विहिरींना विद्युत जोडण्या देणे कामी प्रलंबित असलेल्या एकूण १८८० प्रकरणापैकी फक्त ११६ लाभार्थ्यांना विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. लाभधारकांपैकी काही लाभधारकांनी विद्युत जोडणीसाठी अर्ज केलेले नाहीत. काहीनी विद्युत जोडणीसाठी पैसे न भरणे, चाचणी अहवाल प्रलंबित असणे इत्यादी कारणामुळे उर्वरित लाभधारकांच्या विद्युत जोडणी प्रलंबीत असल्याची बाब उघड झाली. यावरून असे दिसून येते की, लाभधारक विद्युत जोडणी मिळविण्यासाठी उत्सुक नाहीत. शासनाने जवाहर विहिरींची योजना ही अल्पभुधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी सिंचनांची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आणली आहे. परंतु, लाभधारकांचा प्रतिसाद सदर योजनेस अल्प प्रमाणात मिळत असल्याचे जिल्हा परिषद, सोलापूर संदर्भातील वस्तुस्थिती लक्षात घेता दिसून येते.

सबब, **जिल्हा परिषद प्रशासनामार्फत सदर योजने मागील शासनाचा उद्देश लाभार्थ्यांच्या निदर्शनास आणून त्यांना विद्युत जोडणी मिळविण्यासंदर्भात सर्व प्रकारचे सहाय्य करावे जेणे करून सदर योजनेवर विहिर खोदण्यापर्यंत केलेला खर्च वाया जाणार नाही. तसेच विद्युत वितरण कंपनीकडे प्रलंबित असलेल्या २४९ प्रकरणी त्वरीत कार्यवाही करून विद्युत जोडणी केल्याबाबतचा अहवाल व लाभार्थ्यांकडे विविध कारणांनी प्रलंबित असलेल्या १६३१ प्रकरणी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून विद्युत जोडणीची प्रकरणे त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट
# समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कर्यवृत्त

# गुरुवार, दिनांक २९ डिसेंबर, २००७
# स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, चंद्रपूर

## उपस्थिती

१. श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२. श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

३. श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

४ श्री.सुभाष बने, वि.स.स.

५ श्री.संजय राठोड, वि.स.स.

६ श्री.अतुल देशकर, वि.स.स.

७ श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

८ श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

९ श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.रा.रा.काठे, समिती अधिकारी

## ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री.र.ना.अंबरित, उप सचिव

## मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी (लेखा) :
श्रीमती भारती झाडे, उप मुख्य लेखा परिक्षक वरिष्ठ
श्री.भोईटे, उप मुख्य लेखा परिक्षक (पं.रा.स)

## चंद्रपूर जिल्हापरिषदचे अधिकारी :-

१. श्री.व्ही.एस.बरडे, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री.एम.एस.वानखेडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)

३. श्री.आर.पी.सवालाखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं)

४. श्रीमती शैलजा जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

५. श्री.के.ए.परदेशी, प्रकल्प संचालक, जिग्राविय‍ं

६. श्री.एस.डी.चव्हाण, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी

७. श्री.डी.एम.मानकर, कृषी विकास अधिकारी

८. श्री.अ े.वेंकटराव, कार्यकारी अभियंता (सिंचाई)

९. श्री.एस.बी.झोडपे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री.एम.बी.मैदमवार, कार्यकारी अभियंता (ग्रापापू)

११. डॉ.व्ही.एन.कारगिरवार, जिल्हा आयोग्य अधिकारी

१२. श्री.बी.एस.खामणकर, जिल्हा साधन गट प्रमुख, जलस्वराज्य

१३. श्री.के.आर.कुलाल, शिक्षणाधिकारी (प्राथ)

१४. श्री.बी.व्ही.टेकाम, शिक्षणाधिकारी (माध्य)

१५. डॉ.आर.डी.देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१६. श्री.आर.एस.पांडे, समाज कल्याण अधिकारी

१७. श्री.शिषीर घोनमोडे, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) व तालुका स्तरावरील अधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने चंद्रपूर जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची साक्ष घेतली.

## सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २००८
## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, वर्धा

### उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

३. श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

४. श्री.संजय राठोड, वि.स.स.

५. श्री.अतुल देशकर, वि.स.स.

६. श्री.उत्तम इंगळे, वि.स.स.

७. श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

८. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**
श्रीमती मा.प्र.कुळकर्णी, उप सचिव
श्री.कृ.शे.कांबळे, अवर सचिव

**मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी (लेखा), नवी मं ुबई**
श्रमती भारती झाडे, वरिष्ठ उपमुख्य लेखा परिक्षक

**वर्धा जिल्हा परिषदेचे अधिकारी**

१. श्रीमती गं ुजन किन्नु, मुख्य कार्यकारी अधिकारी
२. डॉ.सुनील गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३. श्री.अशोक ठाकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
४. श्री.वसंत बेलेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
५. श्री.अरुण मोहोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)
६. श्रीमती लिना बनसोड, प्रकल्प संचालक , जि.ग्रा.वि.यं.
७. डॉ. प्रेम कळसाईत, जिल्हा आरोग्य अधिकारी
८. डॉ.दिलीप घोरपडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

९. श्री. भुषण मून, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री.सुरेश हंुगे, कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा.

११. श्री.ए.बी.खडसे, कार्यकारी अभियंता (लघुसिंचन)

१२. श्री.अब्दुल रफीक रशीद, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.)

१३. श्री.एस.बी.सिंग कार्यकारी अभियंता, सर्वशिक्षा अभियान

१४. श्री.अर्जून तांदळे, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी

१५. श्री.वि.पु.याउल, कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, आर्वी

१६. श्री.सु.मा.घडे, कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, वर्धा

१७. श्री.प्रदिप भोगले, समाज कल्याण अधिकारी

१८. श्री.नारायण जोशी, प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक) शिक्षणाधिकारी (निरंतर)

१९. श्री. निर्गुणशा ठमके, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) (प्रभारी)

२०. श्री.श्रीकांत पेंदाम, प्र.व.ले.अ.

२१. श्री.जी.सी.रुद्रकार, गट प्रमुख, जल स्वराज्य

२२. श्री.आर.एम.पवार, गट विकास अधिकारी, वर्धा

२३. श्री.एस.एन.मेश्राम, गट विकास अधिकारी, सेलू

२४. श्री.व्ही.एम.जाधव, गट विकास अधिकारी, देवळी

२५. श्री.के.सी.जाधव, गट विकास अधिकारी, आर्वी

२६. श्री.एस.एल.दुसाने, गट विकास अधिकारी, आष्टी

२७. श्री.व्ही.डी.बोरकर, गट विकास अधिकारी, कारंजा

२८. श्री.व्ही.के.धापके, गट विकास अधिकारी, हिंगणघाट

२९. श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, समुद्रपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने वर्धा जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ३० मे, २००८
## स्थळ : जिल्हापरिषद सभागृह, सोलापूर

### उपस्थिती

१. श्री.राजन पाटील, वि.स.स तथा समिती प्रमुख

२. श्री.नाना पंचबुद्धे, वि.स.स.

३. श्री.रमेशचंद्र बंग, वि.स.स.

४. श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.वि.वा.देशमुख, उपसचिव

श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री.र.ना.अंबरित,उप सचिव

श्री.रा.शं.नांगरे, अवर सचिव

**मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी (लेखा):**
श्री.डी.डी. द्वारके, मुख्य लेखा परीक्षक

**सोलापूर जिल्हापरिषदचे अधिकारी :-**

१. श्री.सुनिल मधुकरराव केंद्रेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी.

२. श्री.बी.बी.नेमाणे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.

३. श्री.के.डी.बोने, गटप्रमुख, जलस्वराज्य.

४. श्री.एस.आर.भोसले, मुख्य लेखा वित्त अधिकारी.

५. श्री.डी.बी.मुंढे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र).

६. श्री.एस.व्ही.धोत्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं).

७. श्री.विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक).

८. डॉ.सी.आर.चिलगुंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी.

९. श्री.प्रदीप मोरे, शिक्षणाधिकारी (प्रा).

१०. श्री.एम.एन.वीर, शिक्षणाधिकारी (माध्य).

११. श्री.श्रीकृष्ण कदम, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण).

१२. श्री.एस.ए.चौधरी, कार्यकारी अभियंता बांधकाम-१

१३. श्री.बी.एस.भोसले, कार्यकारी अभियंता बांधकाम-२

१४. श्री.एन.डी.काटे, कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्थानिक स्तर).

१५. श्री.व्ही.व्ही.पवार, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.).

१६. श्री.एम.बी.बनसोडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

१७. श्री.आर.बी.चलवदे, कृषी विकास अधिकारी.

१८. श्री.एम.एन.कावळे, समाजकल्याण अधिकारी.

१९. श्री.दिलीप झेंडे, जि.अ.कृ.अ.सोलापूर.

२०. डॉ.महेंद्र नगरे, जि.श.चि. सार्वजनिक आरोग्य.

२१. डॉ.रमेश सोनावणे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य.

२२. डॉ.द.प.गायकवाड, जिल्हा पशुसंवर्धन, उपायुक्त सोलापूर.

२३. डॉ.संजय कोंडुसैरी, प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी.

२४. श्रीमती पलांडे, का.अ. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

२५. श्री.रविशंकर चलवदे, कृषी विस्तार अधिकारी.

२६. आर.बी.गायकवाड, अक्कलकोट, गट विकास अधिकारी.

२७. पी.पी.मरोड, मोहोळ, गट विकास अधिकारी.

२८. श्री.एस.आर.चिटणीस, पंढरपूर, गट विकास अधिकारी.

२९. श्री.आर.एन.गुरव, कुर्डूवाडी, गट विकास अधिकारी.

३०. श्री.पी.एल.जाधव, माळशिरस, गट विकास अधिकारी.

३१. श्री.जे.आर.आडसळू, सांगोला, गट विकास अधिकारी.

३२. श्री.बी.एम.वासुदेव, दक्षिण सोलापूर, गट विकास अधिकारी.

३३. श्री.एस.व्ही.करडे, उत्तर सोलापूर, गट विकास अधिकारी.

३४. व्ही.टी.साबळे, मंगळवेढा, गट विकास अधिकारी.

३५. श्री.एस.के.चिल्लाळ, बार्शी, गट विकास अधिकारी.

३६. श्रीमती एस.आर.खराडे, करमाळा, गट विकास अधिकारी.

## महावितरण कंपनी, सोलापूर

श्री.अे.बी.भोसले, अधीक्षक अभियंता.

## संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सोलापूर जिल्हापरिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक १२ मे, २०१०
## स्थळ : विधान भवन मुंबई

**उ प स्थि ती**

१. श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

३. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

४. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५. डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री. सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

८. श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

९. श्री. अनिल राठोड, वि.स.स.

१०. श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

११. प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

१२. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१३. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

**मुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी (लेखा )**
श्री. शं.धे.चव्हाण, सहमुलेप, स्थानिक निधी, लेखा

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्रीमती शर्वरी गोखले, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(२) श्री. संजयकुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
(३) श्री. सुनील पोरवाल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग
(४) श्री. पी.एस.मीना, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
(५) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(६) श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव, कृषी विभाग
(७) श्रीमती वंदना कृष्णा, सचिव, महिला व बालविकास विभाग

(८) श्री. राजेश अग्रवाल, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(९) डॉ. प्रदीप व्यास, सचिव, वित्त विभाग
(१०) श्री. गं.म.कंधारे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(११) श्री. सुब्रत रथो, सचिव, ऊर्जा
(१२) श्री. आर.जी.सय्यद, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

(१) डॉ. विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. एस.एस.गव्हाणकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, जलसंधारण विभाग,प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, कृषी विभागा, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, ऊर्जा विभाग, यांची साक्ष घेतली.

## बुधवार दिनांक ९ जून, २०१०
## स्थळः विधान भवन, मुंबई.

**उपस्थिती**

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. समिती प्रमुख
२) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
३) श्री.खुशाल बोपचे, वि.स.स.
४) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.
५) श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
६) श्री.नितीन भोसले, वि.स.स.
७) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.
८) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
९) श्री.सय्यद पाशा पाटेल, वि.प.स.
१०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय -**
(१) श्री.भा.ना.कांबळे - सह सचिव.
(२) श्री.जितेंद्र भोळे - अवर सचिव.

**मुख्यलेखा परीक्षक, स्थानिक निधी (लेखा )**
श्री.शं.धे.चव्हाण, सहमुख्य लेखा परीक्षक

**विभागीय प्रतीनिधी**
श्री.सुधीर ठाकरे - सचिव._ग्रामविकास विभाग
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
श्री.प्रदीप व्यास - सचिव (व्यय), वित्त विभाग
श्री.संजय कुमार - प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग
श्री.जयंत बाँथिया, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्रीमती शोमिता विश्वास, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
श्री.जी.एम.कंधारे - सचिव,_सार्वजनिक बांधकाम विभाग

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**
डॉ.विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव व्यय वित्त विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, सचिव,_सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

## मंगळवार दिनांक ६ जुलै, २०१०
## स्थळ : विधान भवन,मुंबई

**उपस्थिती**

१) श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
३) श्री.बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.
४) श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
५) श्री.सुरेश खाडे, वि.स.स.
६) श्री.विष्णु सावरा, वि.स.स.
७) श्री.नितीन भोसले, वि.स.स.
८) श्री.सुरेश नवले, वि.स.स.
९) ॲड.उषा दराडे, वि.प.स.
१०) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.बी.एन.कांबळे, सहसचिव,

**मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी (लेखा )**
श्री.प्र.ना.पांढरीपांडे

**विभागीय प्रतीनिधी**
श्रीमती शर्वरी गोखले, अति. मुख्य सचिव_सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय
श्री.संजय कुमार, प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय
श्री.सतिश गवई, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय
श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव,पाणी पुरवठा विभाग, मंत्रालय
श्री.सुभाष ठाकरे, सचिव ग्रामविकास विभाग, मंत्रालय
श्रीमती लिना बन्सोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वाषिर्क प्रशासन अहवालाच्या संदर्भात वर्धा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, अति. मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ जून, २०१०**
**विधान भवन, मुंबई**

उ **प स्थि ती**

१) श्री. बबनराव शिंदे, वि. स. स. समिती प्रमुख

२) श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स.

३) श्री. बच्चू कडू, वि. स. स.

४) श्री. बापुसाहेब पठारे, वि. स. स.

५) श्री. सुरेश खाडे, वि. स. स.

६) श्री. विष्णू सावरा, वि. स. स.

७) श्री. विजयराव औटी, वि. स. स.

८) श्री. नितीन भोसले, वि. स. स.

९) ॲड. उषा दराडे, वि. प. स.

१०) श्री. सय्यद पाशा पटेल, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. भा. ना. कांबळे, सह सचिव
श्री. जितेंद्र भोळे, अवर सचिव

**मुख्यलेखा परीक्षक,स्थानिक निधी (लेखा)**
श्री. शं.धे.चव्हाण, सहमुख्य लेखा परीक्षक

**विभागीय प्रतीनिधी**
१) श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव (वि. सु.) वित्त विभाग
२) श्रीमती मालिनी वि. शंकर, प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
३) श्री. संजय कुमार, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग
४) श्री. जयंत बाँठिया, प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
५) श्री. सुधीर ठाकरे, सचिव ग्रामविकास विभाग
६) श्री. प्रकाश दुधलकर, उप सचिव कृषी विभाग
७) श्री. शोमिता बिश्वास, सह सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग
८) डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव ग्रामविकास विभाग
९) श्री. एकनाथ मोरे, उप सचिव ग्रामविकास विभाग
१०) श्री. दि.ग.मोरे, उप सचिव ग्रामविकास विभाग
११) श्री. राठोड, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग

**जिल्हा परिषद, सोलापूर**
श्री.विरेंद्र सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी
डॉ. सी.आर.चिलगुंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी
श्री. बी.एस.भोसले, कार्यकारी अभियंता,बांधकाम
श्री. आर.एस.पाटील, कार्यकारी अभियंता

**जिल्हा परिषद, चंद्रपूर**
डॉ. विपिन शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सोलापूर व चंद्रपूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने सचिव ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव (वि. सु.) वित्त विभाग, प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग तसेच अति.कार्य.सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, उप सचिव कृषी व पदुम विभाग यांची साक्ष घेतली.

**दिनांक - १८ एप्रिल, २०११**
**स्थळ : विधान भवन, मं ुबई**

**उपस्थिती**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

५ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

६ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

७ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

८ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

९ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव,

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,

**संक्षिप्त कार्यवृत्त**

समितीने बैठकीत समितीच्या चौथ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.